**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. २५/२०१५-१६/१७१ दिनांक: ९/१२/२०१५

**आदेश**
**आदेश केस क्र. २५ /२०१५-२०१६**

१) श्री. अजित बाबासाो जाधव अर्जदार
मु. पो. जंगमवाडी ता. हातकणंगले
जिल्हा-कोल्हापूर

विरुध्द

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर.

२) कार्यकारी अभियंता, विरुध्द पक्षकार
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, ग्रा.वि.२ कोल्हापूर.

३) अतिरिक्त कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग, हुपरी.

**कोरमः-** १. श्री. एन. बी. बारसिंग, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

मी श्री. एन.बी. बारसिंग सदस्य सचिव ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहे.

आज दि. २४/११/२०१५ रोजी ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर येथे केस क्र. २५/२०१५-१६ ची सुनावणी झाली. या सुनावणीसाठी ग्राहक श्री. अजित बाबासाो जाधव, मु. पो. जंगमवाडी ता. हातकणंगले जि.

कोल्हापूर यांचे तर्फे प्रतिनिधी श्री. एच.डी. खापरे हे उपस्थितीत होते वि.प. महावितरण तर्फे श्री.ए.बी.पाटणकर उपकार्यकारी अभियंता हुपरी हे हजर होते.

ग्राहकाची मागणी तक्रारीचे स्वरुपे ग्राहक श्री. अजित बाबासो जाधव मु. पो. जंगमवाडी ता. हातकणंगले जि. कोल्हापूर १२/३६३ जुना शिवाजीनगर पोलीस स्टेशन पोस्टाजवळ इचलकरंजी यांनी त्यांच्या गट क्र.११ मध्ये ५ अश्वशक्ती शेतीपंपासाठी विदयुत जोडणी मिळावी म्हणून अर्ज केला आहे. सदरकामी रु. २६५०/- पावती क्र ५१६७४३ नुसार दि. १६/१/२०१३ रोजी भरलेले आहेत. कृतीमानके विनिमयानुसार हा जादा रोहित्र विस्तार असलेने हा वीज पुरवठा दि. १५/१/२०१४ पर्यत व्हावयास हवा होता तो आजतागायत झालेला नाही असे अर्जदाराने म्हटलेले आहे. अर्जदाराने कोल्हापूर अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे दि. ४/८/२०१५ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. पण त्यावर अदयाप आदेश प्राप्त झालेला नाही. तरी वीज पुरीवठा देणेचा आदेश व्हावा विलंबा बाबत भरपाई अर्ज दि. ३/८/२०१५ रोजी कार्यकारी अभियंता महावितरण विभागीय कार्यालय ग्रा.वि. २ कोल्हापूर येथे केलेला आहे त्यावरील काय कारवाई झाली हे ग्राहकास अवगत करावे अशी ग्राहकाची लेखी मागणी असून त्याप्रमाणे ग्राहक यानी तोंडीपण ही माहिती सविस्तर सांगितलील यावर कंपनीचे अधिकारी श्री. पाटणकर यांनी सध्या इन्फ्रा २ प्रमाणे सन २०१२-१३ चे काम सुरु असल्याचे सांगितले या संबंधीचे काम मे.प्रतिभा व प्रतिक असो. यांना दिलेले होते. त्याप्रमाणे ते चालू पण होते सध्या या कंपनीचे काम काढून घेतले आहे (Termineted) आणि दुसरी एजन्सी नेमणेचे कामकाज चालू आहे असे सांगितले आणि तसे पत्र पण त्यांनी दि.२७/११/२०१५ ला दिले. या पत्रात त्यांनी श्री. अजित बाबासो जाधव यांचे विज जोडणीचे काम अग्रक्रमाने केले जाईल असे सांगितले.

**<u>वरील विवेचनावरुन खालील मुद्दे उपस्थितीत होतात.</u>**

१. अर्जदारास वीज जोडणी देता येईल का?

उत्तर :- होय

२. विलब भरपाई अर्जावरील कार्यवाही?

उत्तर :- नियमाप्रमाणे.

३. आदेश?

उत्तर :- अंतिम आदेशाप्रमाणे.

**<u>कारण मिंमासा</u>**

अर्जदाराने दि. १६/१/२०१३ रोजी पावती क्र ५१६७४३ प्रमाणे रु. २६५०/- भरलेले आहेत. कृतीमानके २०१४ प्रमाणे परिपूर्ण अर्ज प्राप्त झालेनंतर वितरण यंत्रणेचाच भाग असलेने या अर्जदाराच्या बाबतीत हा कालावधी संपून गेला आहे. महातिवरणचे आपली बाजू मांडतांना संबंधीत ठेकेदाराचे काम काढून घेतल्याचे सांगून नविन ठेकेदार नेमणेची प्रक्रिया सुरु आहे असे सांगितले.

सध्या कृषी पंपाच्या प्रलंबीत वीज जोडण्या त्वरीत द्याव्यात असे धोरण महावितरणचे आहे असे मंचाच्या लक्षांत आले आहे. तरी संबंधीत अधिका-यांनी सदर केस विशेष बाब समजून त्वरीत वीज जोडणी व्यवस्था करावी

असे मंचाचे मत झाले आहे. जवळ जवळ ३ वर्षे या ग्राहकाचा अर्ज प्रलबीत आहे. यांचा मंचास खेद होतो. ग्राहकाची मागणी त्वरीत म्हणजे दि. २५/२/२०१६ पूर्वी पूर्ण करावी

विलंब भरपाईच्या बाबतीत ग्राहकाने केलेल्या अर्जावर संबंधीतीना नियमाप्रमाणे कार्यवाही करावी असे मंचास वाटते.

## आदेश

१. ग्राहकाला वीज पुरवठा त्वरीत करणेत यावा.
२. भरपाई अर्जावर संबंधीतानी कार्यवाही करावी.
३. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.
४. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ९-१२-२०१५

(एन. बी.बारसिंग)
सदस्य सचिव

अध्यक्ष पद दिनांक १६-१२-२०१४ पासून रिक्त.

श्री. पी. एस. बुरांडे,
ग्राहक सदस्य,

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.